ई) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम,१९६७ मधील तरतुदीनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशन व पदोन्नती यांचे प्रमाण शिथिल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना देण्यात आलेले आहेत.

उ) दिनांक २६.५.२००८, दि.१९.०३.२०१४ व दि.२१.०२.२०१५ च्या परिपत्रकांन्वये कर्मचा-यांचे सेवा विषयक वैयक्तिक प्रस्ताव शासनाकडे न पाठविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ऊ) दिनांक ३१.१०.२०१४च्या परिपत्रकान्वये न्यायालयीन प्रकरणी करावयाची कार्यवाही व घ्यावयाच्या दक्षतेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

४. अशा सूचना असूनही जिल्हा परिषद कर्मचा-यांची सेवाविषयक वैयक्तीक प्रकरणे शासन स्तरावर वारंवार पाठविली जातात असे दिसून आले आहे. अनेक गौण स्वरुपाच्या प्रकरणांमध्ये शासनाकडून गैरवाजवी मार्गदर्शन मागविण्यात येते. अनेकदा वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी थेट रित्या शासनाकडे व्यक्तिशः उपस्थितीद्वारे वा पत्रव्यवहाराद्वारे दाद मागतात. या गोष्टींमुळे शासन स्तरावर अकारणपणे वेळेचा अपव्यय होतो.

५. शासनाचा प्रशासकीय विभाग म्हणून या विभागाकडून आदेश/सूचना दिल्या जातात. त्याद्वारे जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रशासकीय कामकाज चालविणे अभिप्रेत आहे. शासन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आहे. एखादया मुदयावर कोणत्याही मार्गदर्शक सूचना नसतील तर त्यावेळी शासनाकडे संदर्भ केल्यास ती बाब समजून घेता येईल. परंतु, अलिकडच्या काळात जिल्हा परिषदांमधील वेगवेगळया विभागाच्या, विभाग प्रमुखांकडून शासनाकडे प्रचलित नियम/अधिनियम न तपासता संदर्भ केले जातात. त्यामुळे शासन स्तरावर शासनाच्या नियमित कामकाजावर विपरित परिणाम होत आहे.

६. वरील गोष्टींचा विचार करुन, क्षेत्रीय कार्यालयातील कार्यपध्दतीत सुधारणा करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे सूचना देत आहे.

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद किंवा विभागीय आयुक्त यांना अधिकार प्रदान केलेल्या बाबीं संदर्भातील जिल्हा परिषद कर्मचा-यांचे वैयक्तिक सेवा विषयक प्रस्ताव/संदर्भ शासनाकडे पाठविण्यात येवू नयेत.



Scanned by CamScanner

२) सेवा विषयक बाबी विषयी प्रचलित नियम/तरतुद याबाबत काही मार्गदर्शनाची आवश्यकता असल्यास निव्वळ त्या बाबी/मुदयांचा उल्लेख करुन त्या संदर्भातील नियम/तरतुदींसह शासनाकडे मार्गदर्शन प्रस्ताव सादर करण्यात यावेत. असे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कोणत्याही परिस्थितीत प्रथम विभागीय आयुक्त यांना सादर करावेत. त्यानंतरही शासन स्तरावरील मार्गदर्शनाची आवश्यकता भासल्यास असे प्रस्ताव विभागीय आयुक्त स्तरावरुन शासनास सादर करण्यात यावेत. असे प्रस्ताव सोबतच्या विवरणपत्रातच सादर करण्यात यावेत.

<u>कोणत्याही परिस्थितीत कर्मचा-याच्या वैयक्तिक नावांने प्रस्ताव सादर करु नयेत</u>.

३) ज्या बाबींसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच विभागीय आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत फक्त अशा बाबीं संदर्भातील प्रस्ताव सविस्तर विवेचन व कागदपत्रांसह सादर करण्यात यावेत.

४) बऱ्याच वेळा असे आढळून येते की, औद्योगिक/कामगार न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालयात बाजू न मांडल्यामुळे न्यायालया मार्फत एकतर्फी निर्णय दिला जातो. प्रतिज्ञापत्राव्दारे तसेच वकीलांमार्फत प्रशासनाची बाजू योग्यप्रकारे मा. न्यायालयासमोर मांडली जात आहे ना याचा आढावा घेण्यात यावा. न्यायालयीन प्रकरणांबाबत निष्काळजीपणा निदर्शनास आल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तात्काळ जबाबदारी निश्चित करुन, कारवाई करण्याकरिता विभागीय चौकशी सुरु करण्यात यावी.

५) मा. न्यायालयाच्या निर्णया संदर्भात एकतर अपील/पुनर्विलोकन याचिका दाखल करणे अथवा त्या आदेशाची अंमलबजावणी करणे असे दोनच पर्याय समोर असतांना मा. न्यायालयाच्या आदेशाची योग्य ती दखल विहीत कालावधीत घेतली जात नाही. पर्यायाने अवमान याचिकांची संख्या वाढते आहे. त्यामुळे मा.न्यायालयाच्या आदेशाची विहीत कालावधीत अंमलबजावणी/अपील/पुर्नविलोकन न करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर तात्काळ जबाबदारी निश्चित करुन, कारवाई करण्याकरिता विभागीय चौकशी सुरु करण्यात यावी.



Scanned by CamScanner

६) अशा प्रकारे जिल्हा स्तरीय कार्यवाही विहीत कालावधीत न झाल्यामुळे सचिवांच्या नावाने अवमान याचिका झाल्यास संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याबाबत जबाबदार धरुन त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल व याची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात घेतली जाईल.

यापुढे वरील प्रमाणे कार्यवाही करण्याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०१०३१९१०४४२०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Aseem Gupta
Date: 2017.01.04 15:08:51 +05'30'

( असीम गुप्ता )

शासनाचे सचिव.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
राज्य प्रकल्प संचालक, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान/
राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान.
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण.
सर्व कक्ष अधिकारी/अवर सचिव/उप सचिव/सह सचिव, ग्राम विकास विभाग, मुंबई.
निवड नस्ती (आस्था-७)



Scanned by CamScanner

# विवरणपत्र

**जिल्हा परिषदेचे नांव :-**

| अ.क्र. | उपस्थित केलेला मुद्दा | जिल्हा परिषदेने त्याकरिता तपासलेले शासन निर्णय/परिपत्रक/नियम/अधिनियम. | जिल्हा परिषदेचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद---------------

-

विभागीय आयुक्त यांचे अभिप्राय

विभागीय आयुक्त,
---------------विभाग.



Scanned by CamScanner

जिल्हा परिषदेकडील कर्मचा-यांच्या वैयक्तिक सेवा विषयक बाबींसंदर्भात जिल्हा परिषदांकडून शासनाकडे करण्यात येणारा पत्रव्यवहार.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- जिपसे- २०१६/प्र.क्र. २३२/आस्था-७,
२५- मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,
मुंबई-४०० ००१,
दिनांक : ०३ जानेवारी, २०१७.

वाचा :-

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१
२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७
३) जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपील ) नियम, १९६४
४) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम,१९६८

परिपत्रक

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम ९५ (ब) अन्वये जिल्हा परिषदेअंतर्गत जिल्हा तांत्रिक सेवा आणि जिल्हा सेवा संवर्गातील वर्ग-३ च्या व वर्ग-४ च्या कर्मचा-यांच्या नियुक्तीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ मधील नियमा नुसार वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचा-यांचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना घोषित करण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपील ) नियम, १९६४ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम,१९६८ मधील कलम १० अन्वये सेवा विषयक बाबींसाठी शासनाचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये विहीत केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम, १९६७ नुसार जिल्हा परिषद

Scanned by CamScanner

कर्मचा-यांच्या संदर्भात सेवेच्या विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्तीमध्ये रजा, वेतन, सेवानिवृत्ती, निवृत्ती वेतन, वेतनवाढ, ज्येष्ठता, पदोन्नती, प्रवास भत्ता इत्यादी बाबी महाराष्ट्र नागरी सेवेमधील राज्य शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना जश्या लागू होतात त्याप्रमाणे त्या जिल्हा परिषद कर्मचा-यांना योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात आलेल्या आहेत. त्या संदर्भात निर्णय घेण्यास नियुक्ती प्राधिकारी हे सक्षम आहेत. तसेच या कर्मचा-यांना मानीव दिनांक देण्याबाबतचे अधिकार शासनाने विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेले आहेत.

३. उपरोक्त तरतुदी विचारात घेऊन सेवा विषयक बाबींसंदर्भात कार्यवाही संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त यांना यापूर्वी खालील प्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

अ) या विभागाच्या दिनांक २८.०७.२००६ च्या परिपत्रकानुसार जिल्हा परिषदेमधील कर्मचा-यांची मानीव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे विभागीय आयुक्त स्तरावरच निकाली काढण्यात यावीत.

ब) या विभागाच्या दिनांक ०६.०१.२००७ च्या परिपत्रकानुसार कर्मचा-यांचे पद तसेच रुपांतरित नियमित अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबतच्या शासन आदेशातील सुधारणा, फेरफार करण्यास विभागीय आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

क) या विभागाच्या दिनांक १८.०१.२००७ च्या शासन निर्णयानुसार कर्मचा-यांना कामानुसार हुददा व हुददयानुसार वेतनश्रेणी देण्याबाबतची प्रकरणे निकाली काढण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

ड) या विभागाच्या दिनांक १७.१०.२००५ च्या परिपत्रकानुसार कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगती योजनेसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

इ) या विभागाच्या दिनांक १८.११.२००९ च्या परिपत्रकानुसार अन्वये निवृत्ती वेतन विषयक प्रकरणे तसेच मा. लोकायुक्त कार्यालयाकडील संदर्भ याबाबत करावयाची कार्यवाही व अधिकार सूचित करण्यात आलेले आहेत.



Scanned by CamScanner